

UGC Approved Sr. No. 49366

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED
IMPACT FACTOR
SJIF 2016
6.177






An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

5

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

SJIF 2016 = 6.177

**Online ISSN 2278-8808** **Printed ISSN 2349-4766**

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies**

**OCT-DEC, 2017, VOL-6, ISSUE-34**

266 **भारतीय शेतीची आधुनिकता आणि सद्यस्थिती**
*प्रा. डॉ. कदम प्रमोदिनी विठ्ठल (1173-1181)*

267 **मानव संसाधन व्यवस्थापन :– श्रमशक्तीचा आदर्श स्त्रोत**
*डॉ. डी.एस. पाटील (1182-1188)*

268 **भारतातील कृषि क्षेत्र आणि कर्जपुरवठा**
*प्रा.डॉ. अरुण तवार & प्रा.डॉ. शिवाजी पाते (1189-1192)*

269 **औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे योगदान**
*प्रा. डॉ. आर. डी. भोसले (1193-1196)*

270 भारतीय शेतीसमोरील आव्हाने आणि शेती विकास
*प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे (1197-1202)*

271 **मानव विकास निर्देशांक व भारतीय मुस्लिम समाज— अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालूक्यातील शहरी भागाचा एक व्यष्टी अध्ययन**
*प्रा. डॉ. विजयकुमार वावळे, शायिन यासिन शेख (1203-1209)*

272 **भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी एक अभ्यास**
*अनंत श्रीराम राठोड (1210-1213)*

273 **वस्तू व सेवा करांचा लघू व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव**
*प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव (1214-1216)*

274 **कातकरींचा सामाजिक दृष्टीकोन : एक अभ्यास**
*डॉ. आर. के. दातीर & श्री. विनायक तु. खातळे (1217-1220)*

275 **भारताचे विदेश व्यापार धोरण : निर्यात वद्धीतील प्रमुख अडथळा ?**
*प्रा. डी. डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस. जी. वैद्य (1221-1226)*

276 **अहमदनगर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा चिकित्सक अभ्यास**
*संगिता रामेश्वरलाल जांगीड & प्रा.डॉ.ए.एम.पवार (1227-1229)*

310 आदिवासी शिक्षण- दशा आणि दिशा
मोरे रविंद्र गोरखनाथ (1395-1396)

311 ग्रामीण विकासातील पंचायतराज संस्थांची भूमिका
पवार जालिंदर गोरखनाथ (1397-1398)

312 अकोला जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे अध्ययन
डॉ. कु. प्राजक्ता वि. पोहरे & डॉ. रामेश्वर मा. भीसे (1399-1410)

313 जीएसटी कर प्रणालीची संरचना आणि परिणाम
पाकळकुळे अनुराधा रामराव & प्रा. डॉ. अशोक कोरडे (1409-1411)

314 कृषी विकास योजनांचा शेती क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा चिकीत्सक अभ्यास
डॉ. राजेंद्र भोसले & गायकवाड ज्योती नानासाहेब (1412-1417)

315 स्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या स्वच्छभारत अभियानाचा अभ्यास
डॉ. सुहास आव्हाड & दिगांबर ज्ञानदेव नलगे (1418-1420)

316 आर्थिक सुधारणा काळातील विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीचा महाराष्ट्र राज्य सकल अंतर्गत उत्पादनावरील परिणाम
प्रा. मदन शेळके (1421-1426)

317 स्वयंसहाय्यता समुह बँक संलग्न कार्यक्रमांचा आढावा
प्रा. संतोष एम. वाघमारे & डॉ. अजय पी. कुटे (1427-1430)

318 भारतात परकीय भांडवलाची भूमिका
प्रा. वैशाली योगराज मेले (1431-1435)

319 सेंद्रिय शेती पदधती काळाची गरज
कु. रुपाली जाधव (1436-1437)

320 शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्त्या : 2011 ते 2017 (संदर्भ : नाशिक जिल्हा)
प्रा. डॉ. अनिल डी. पवार (1438-1442)

321 शाश्वत विकासासाठी सेंद्रीय शेतीचे महत्त्व : एक अभ्यास
प्रा. एम.डी. हिरे (1443)

322 वस्तु व सेवा कर – वाटचाल आणि प्रत्यक्ष आकारणी
प्रा. डॉ. सुनील पं. उगले (1444-1449)

323 मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व त्याचा प्रभाव
प्रा. तुळशीदास मोकल (1450-1453)

324 जागतिकीकरणाचा कृषीमाल विपणन व्यवस्थेवरील परिणाम
प्रा. डॉ. आर. के. जाधव (1454-1460)

325 भारतातील विविध कृषी आधारित उद्योगांच्या समस्या आणि संधी
श्री. गणेश तुकाराम टाकरे (1461-1475)

# मध्ययुगीन भारतातील उद्योग, व्यापार व त्याचा प्रभाव

**प्रा. तुळशीदास मोकल**

*को.ए.सो.डॉ.सी.डी. देशमुख, वाणिज्य व सौ.के.जी. ताम्हाणे कला महाविद्यालय, रोहा–रायगड.*

**प्रस्तावना** :– प्राचीन कालखंडात आपला भारत देश आर्थिक दृष्ट्या समृध्द होता ही आर्थिक समृध्दता गुप्तांच्या राजवटीत उत्कर्षाच्या शिखरावर जावून पोहचली होती. ती टिकविण्याचा प्रयत्न वर्धन राजकर्त्यानी नेटाने केला. वर्धनानंतर एकसंघ असणारा भारत देश दुभंगला व आपापसातील हेवे दावे वाढवत राजकर्ते एक–मेकांन विरुध्द लढू लागले. याच संधीचा फायदा घेवून महमंद गझानीने भारतावर सतरा स्वाऱ्या करुन भारताची प्रचंड प्रमाणात आर्थिक लय–लुट केली. महमंद घोरीने आठ स्वाऱ्या करुन पुन्हा एकदा भारताची प्रचंड लुट केली. याही पुढे जावून त्यांनी ऐबक नामक प्रतिनीधी भारतात ठेवला व याच ऐबकाने भारतावर इस्लाम सत्तेचे अधिराज्य निर्माण केले. व हे अधिराज्य सहा शतकाहून अधिक वर्ष सुरु राहीले. सुरुवातीला तुर्की मुसलमानांचे सलतनत राज्य, नंतर अफगाण मुसलमानांचे मोगल अधिराज्य या परकीय राजवटीने भारतावर राज्य केले तसेच देवगीरीचे यादव व छत्रपती शिवाजी महाराज्यांची हिंदवी स्वराज्य राजवट या दोन राजवटी याच काळातील. या चार राजवट काळातील भारतातील उद्योग, व्यापार कसा होता व त्याचा प्रभाव त्या कालखंडात कोणकोणत्या घटकांवर झाला याची माहिति प्रस्तूत शोध निबंधात मांडण्यात आली आहे.

- **शोध निबंधाचा उद्देश** :– मध्ययुगीन भरतातील उद्योग, व्यापार व त्याचा प्रभाव जाणून घेणे हा प्रस्तूत लघूशोध निबंधाचा उद्देश आहे.
- **लघुशोध निबंधाची उद्दिष्ट्ये** :–
  1. मध्ययुगीन भारतातील उद्योगांच्या माहितीचे अध्ययन करणे.
  2. मध्ययुगीन भारतातील व्यापाराच्या माहितीचे अध्ययन करणे.
  3. मध्ययुगीन भारताच्या उद्योग, व्यापाराचा कोणकोणत्या घटकांवर प्रभाव पडला त्याचे अध्ययन करणे.
- **लघूशोध निबंधासाठी माहीती संकलन** :– लघुशोध निबंधासाठी आवश्यक असणारे माहिति संकलन संबंधीत विषयाशी संबंधीत ग्रंथ, संदर्भग्रंथ, संदर्भ पत्र, तत्कालीन प्रवासवर्णने, मासिके, साप्ताहिके, अहवाल व इंटरनेट या दुय्यम साधनांच्या माध्यमातून करण्यात आले आहे.
- **विषयाचे महत्व** :– प्रस्तूत शोध निबंधाच्या विषयातून मध्ययुगीन कालखंडातील भारताच्या सलतनत, मोगल, यादव, व छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजवट कालखंडातील उद्‌योग, व्यापाराची माहिति उपलब्ध होणार आहे. त्याच बरोबर या दोन्ही घटकांचा कोणकोणत्या परिस्थितीवर व त्या कालखंडातील राज्यकर्त्यांवर, व्यक्तीसमुहावर प्रभाव पडला आहे याची माहिति उपलब्ध होणार आहे. त्यामुळेच या विषयाला महत्व आहे.
- **विषय प्रवेश** :– या शोध निबंधात सर्व प्रथम मध्ययुगीन भारत कालखंडातील उद्‌योगांची माहिती मांडत आहेत. सुलतान, यादव, मोगल व मराठे यांच्या कालखंडात कोणकोणते उद्‌योग प्रचलीत होते ते प्रथम नमुद करत आहे.